# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** हिंगोली शहर
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0804 **Year (वर्ष):** 2025
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**27/10/2025 20:15

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(१)इ |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(२) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(१)(ब) |
| 4 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 5 | भारतीय दंड संहिता १८६० | १०९ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 01/01/2005
      **Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/03/2022
      **Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 00:00 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 27/10/2025 **Time (वेळ):** 20:02 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 030
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/10/2025 20:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      दक्षिण, .5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** लालुप्रवि कार्यालय हिंगोली, हिंगोली,हिंगोली

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** RAJESH HANMANLU MALPILU

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** हनुमानलु

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 11/03/1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | RATMALI TQ DHARMABAD,NANDED,धर्माबाद,नांदेड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | RATMALI TQ DHARMABAD,NANDED,धर्माबाद,नांदेड,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8485070037

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मनोहर लक्ष्मण खिल्लारी | | वडील का नाम : लक्ष्मण | 1. गोरे ले आउट,माऊली नगर, वाशिम,वाशिम,वाशिम,वाशिम, महाराष्ट्र,भारत |
| 2 | रेखा मनोहर खिल्लारी | | आई का नाम : मनोहर | 1. गोरे ले आऊट,माऊली नगर, वाशिम,वाशिम,वाशिम,वाशिम, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली

दिनांक:-27. 10.2025

फिर्याद

मी, राजेश हनमनलु मलपिलु वय 41 वर्ष व्यवसाय नौकरी पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली. मो.नं 8485070037 सरकारतर्फे फिर्याद देतो की,

मी दि. 10.06.2025 पासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. आरोपी लोकसेवक मनोहर लक्ष्मण खिल्लारी, वय 60 वर्ष, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी जि. हिंगोली, रा.माऊली नगर,गोरे ले आउट, वाशिम जि. वाशिम यांचा पोस्टे कळमनुरी जि. हिंगोली येथे दाखल गुरन 239/2020 कलम 7(A) ,7(C), 12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे गुन्हयात तपासादरम्यान सहभाग निश्पन्न झाल्याने त्यांना दिनांक 27.01.2021 रोजी नमुद गुन्हयात अटक करण्यात आली होती. त्यातुन त्यांचे वाशिम येथील राहते घराची मा.पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि कार्यालय वाशिम यांचे करवी घरझडती घेण्यात आली होती. त्यानंतर तत्कालीन चौकशी अधिकारी श्री. नितीन देशमुख, प्र.पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली यांनी या कार्यालयाचे जा.क्र. DYSPACBHNL/SPACB/OE Permission/646/2021 दिनांक 23/02/2021 अन्वये मा.पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.नांदेड यांचे मार्फतीने मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अहवाल पाठवुन आरोपी लोकसेवक मनोहर लक्ष्मण खिल्लारी यांचे मालमत्तेची उघड चौकशी करण्याची परवानगी मागण्यात आली होती. त्यावरून मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश जा.क्र चौऊ/45/वर्ग 1/हिंगोली/4193/2021 दिनांक 21.04.2021 अन्वये उघड चैकशी क्रमांक देवून, आरोपी मनोहर खिल्लारी यांचे मालमत्तेची उघड चौकशी करण्याचे आदेश प्राप्त झाले बाबतचे पत्रक, मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, परिक्षेत्र नांदेड यांचे पत्रक जा.क्र. 1760/2021 दि.04.05.2021 अन्वये प्राप्त झाले होते. त्यावरून श्री.निलेश सुरडकर, पोलीस उप अधीक्षक लाप्रवि हिंगोली यांनी आरोपी लोकसेवक मनोहर खिल्लारी यांचे मालमत्तेची उघड चौकशी सुरू केली.

दरम्यानच्या कालावधीत आरोपी लोकसेवक मनोहर लक्ष्मण खिल्लारी, व्यवसाय नौकरी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा ना. ता. जि. हिंगोली, वर्ग-1 यांचेवर यशस्वी सापळा कार्यवाही होवुन त्यांना पो.स्टे. औंढा ना. जि. हिंगोली, गुरनं 50/2022 कलम 7 भ्र. प्र.अधि. मध्ये दि. 15.03.2022 रोजी गुन्हयात अटक करण्यात आली होती. त्यानंतर गै.अ.मनोहर खिल्लारी यांचे वाशिम येथील राहते घराची दुसऱ्यांदा मा.पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि कार्यालय वाशिम यांचे करवी घरझडती घेण्यात आली होती त्यावरून यापुर्वी सुरू असलेल्या उघड चौकशिमध्ये तत्कालीन चौकशी अधिकारी श्री. विनायक जाधव, ला.प्र.वि.हिंगोली यांनी आरोपी मनोहर खिल्लारी यांचे उघड चौकशीचा परीक्षण कालावधी वाढवुन मिळणे बाबत मा. पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नांदेड यांना दिलेल्या अहवालावरून मा. पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नांदेड यांचे कार्यालयाचे जा.क्र.4227/2023 दि.29.08.2023 अन्वये परवानगी मिळाल्याने त्यांचा परीक्षण कालावधी दि.01.01.2005 ते दि. 15.03.2022 असा निश्चित करण्यात आला आहे.

नमुद उघड चौकशिमध्ये तत्का. चौकशी अधिकारी श्री नितीन देशमुख प्र.पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि हिंगोली,

निलेश सुरडकर, पोलीस उप अधिक्षक, लाप्रवि हिंगोली, श्री.विनायक जाधव, पोलीस निरीक्षक, लाप्रवि हिंगोली यांनी चौकशी करून अहवाल मा. महासंचालक, ला.प्र.वि. मुंबई यांचे कार्यालयात सादर केला होता. त्यानंतर आम्ही राजेश मलपिलु, पोलीस निरीक्षक, लाप्रवि हिंगोली यांनी चौकशी अधिकारी म्हणुन मा. वरिष्ठांचे सुचनेप्रमाणे आरोपी लोकसेवक मनोहर खिल्लारी व त्यांची पत्नी सौ.रेखा मनोहर खिल्लारी यांच्या मालमत्ताचे चौकशी करुन त्यांच्या विरुध्द एकुण उत्पन्नाच्या ज्ञातस्त्रोतापेक्षा जास्तीची मालमत्ता संपादित केल्याचे निश्पन्न झाल्याचा सविस्तर सुधारीत वर्कशिट अहवाल मा. पोलीस अधीक्षक, लाप्रवि नांदेड परिक्षेत्र नांदेड यांच्या मार्फतीने मा.महासंचालक, लाप्रवि मुंबई यांच्याकडे दि.23.09.2025 अन्वये सादर केला होता.
सदर अहवालाचे मा.महासंचालक, लाप्रवि मुंबई यांनी अवलोकन करुन त्यांचे कार्यालयाचे जा.क्र. ला.प्र.वि/मुख्या/उ.चौ./45/हिंगोली/2021/9581 दि.15.10.2025 अन्वये एकुण चार प्रकारच्या सुचना देवुन, दिलेल्या सुचनांची पुर्तता करून नमुद उघड चौकशी प्रकरणामध्ये अपसंपदा गुन्हा दाखल करण्याची परवानगी दिले बाबत मा. पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.नांदेड यांचे पत्र प्राप्त झाले आहे. आरोपी लोकसेवक मनोहर खिल्लारी यांचे स्वतःचे नावे व त्यांचे कुटूंबियांच्या नावे उत्पन्न, खर्च व मालमत्ता या बाबत त्यांचे व त्यांचे कुटूंबिय, नातेवाईक यांचे तत्कालीन चौकशी अधिकारी यांनी वेळोवेळी सविस्तर जबाब नोंदविले असून, त्यांचे व त्यांचे कुटूंबियांचे ज्ञात उत्पन्न, खर्च व मालमत्ते संबंधाने शासकीय कार्यालय व ईतर विभागांशी पत्रव्यवहार करून, तसचे संबंधीत शाळा, महाविद्यालय, यांचेकडुन माहीती घेवुन निश्पन्न मालमत्ते बाबत, अन्य खर्च, मालमत्ता व उत्पन्नाबाबत माहिती घेवून आरोपी लोकसेवक यांना त्यांची बाजु मांडण्याची पुर्ण संधी देण्यात आली आहे.
प्रस्तुत उघड चौकशीमध्ये आलोसे मनोहर लक्ष्मण खिल्लारी, वय 60 वर्ष, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी जि. हिंगोली यांचा दिनांक 01/01/2005 ते 15.03.2022 रोजी पर्यत परिक्षण कालावधी निष्चित करुन आलोसे मनोहर खिल्लारी व त्यांची पत्नी सौ.रेखा मनोहर खिल्लारी यांच्या मालमत्तेची सविस्तर उघड चौकशी पुर्ण केली आहे. त्यामध्ये आलोसे मनोहर खिल्लारी यांचे एकुण ज्ञात उत्पन्न, खर्च व मालमत्ता खालील प्रमाणे निश्पन्न झाले आहे.
आरोपी लोकसेवक मनोहर लक्ष्मण खिल्लारी व त्यांची पत्नी रेखा मनोहर खिल्लारी व त्यांचे मुलांचे यांच्या नावे असलेली मालमत्ता:-
आरोपी लोकसेवक मनोहर लक्ष्मण खिल्लारी व त्यांची पत्नी रेखा मनोहर खिल्लारी यांच्या नावे असलेली परिक्षण कालावधीतील एकुण स्थावर व जंगम मालमत्ता 1,03,42,217/- रु असल्याचे निश्पन्न झाले आहे. त्यामध्ये त्यांचे मालमत्तेचे थोडक्यात विवरण खालील प्रमाणे.
1) मनोहर लक्ष्मण खिल्लारी यांचे नावे निश्पन्न झालेली मालमत्ता - शेती खरेदी, प्लॉट, सदनिका, चार चाकी वाहन, दोन चाकी वाहन, बँकेतील पैशाच्या ठेवी व निवासस्थानामध्ये घर झडतीमध्ये मिळुन आलेली व इतर असे सर्व मिळुन आलेली मालमत्ता - 75,56,381/- रु
2) सौ.रेखा मनोहर खिल्लारी यांचे नावे निश्पन्न झालेली मालमत्ता - शेती खरेदी, प्लॉट,व इतर असे सर्व मिळुन आलेली मालमत्ता - 21,26,786/- रु
3) मुलगा अजय मनोहर खिल्लारी व मुलगी पल्लवी मनोहर खिल्लारी यांचे नावे निश्पन्न झालेली मालमत्ता - बँकेतील पैशाच्या ठेवी व इतर असे सर्व मिळुन मालमत्ता - 6,59,050/- रु
आरोपी लोकसेवक मनोहर लक्ष्मण खिल्लारी व त्यांची पत्नी सौ.रेखा मनोहर खिल्लारी यांनी केलेला खर्च:- आलोसे मनोहर लक्ष्मण खिल्लारी व त्यांची पत्नी सौ.रेखा मनोहर खिल्लारी यांनी परिक्षण कालावधीमध्ये 33 टक्के नाशाबीतीचा घरखर्च, कर्ज परतफेड खर्च, मालमत्ता खरेदी खर्च, व इतर कारणासाठी केलेला एकुण खर्च - 89,77,512/- रुपये निश्पन्न झालेला आहे.
आरोपी लोकसेवक मनोहर लक्ष्मण खिल्लारी व त्यांची पत्नी सौ.रेखा मनोहर खिल्लारी यांचे नावे असलेले उत्पन्न:- आलोसे मनोहर लक्ष्मण खिल्लारी व त्यांची पत्नी सौ.रेखा मनोहर खिल्लारी यांचे नावे परिक्षण कालावधीमध्ये मिळालेले वेतनाचे उत्पन्न, कर्ज उत्पन्न, जि.पी.एस. ना परतावा उत्पन्न, मुदत ठेव/एल.आय.सी वरील मिळालेले उत्पन्न, शेत पिकाचे मिळालेले उत्पन्न, दुश्काळी अनुदान, बँकेतील शिल्लक रक्कमेवरील व्याज उत्पन्न, निवडणुक भत्यातुन मिळालेले उत्पन्न व इतर ज्ञात स्त्रोतातुन मिळालेले एकुण 1,43,09,746/- रुपये ज्ञात उत्पन्न उघड चौकशीमध्ये निश्पन्न झालेले आहे.
गै.अ.मनोहर खिल्लारी व त्यांची पत्नी सौ.रेखा मनोहर खिल्लारी यांची दि. 01.01.2005 ते दिनांक 15.03.2022 या परिक्षण कालावधी मधील अपसंपदेची एकत्रित गणना खालील प्रमाणे:-

अपसंपदेची गणना

अ.क्र.

तपशिल
एकुण
1)दि.15/03/2022 रोजी असलेली मालमत्ता (विधान ब) -1,03,42,217/-रू.
2)दि.01/01/2005 रोजी असलेली मालमत्ता (विधान अ) -6,04,208/-रू.
3)परिक्षण कालावधीतील एकुण मालमत्ता (विधान ब-अ)-97,38,009/-रू.
4)परिक्षण कालावधीतील एकुण खर्च (विधान ड) -89,77,512/-रू.
5)परिक्षण कालावधीतील एकुण एकुण मालमत्ता व खर्च ( 3+4 )- 1,87,15,521/-रू.
6)परिक्षण कालावधीतील एकुण उत्पन्न (विधान क) - 1,43,09,746/-रू.
7)अपसंपदा (5-6)- + 44,05,775/-रू.
8)अपसंपदा टक्केवारी = अपसंपदा X 100/ एकूण उत्पन्न (DA X100/TOTAL Income) + 30.78%

आरोपी लोकसेवक मनोहर खिल्लारी व त्यांची पत्नी सौ.रेखा खिल्लारी यांचे परिक्षण कालावधी दिनांक 01.01.2005 ते 15.03.2022 मध्ये एकुण उत्पन्न 1,43,09,746/- रुपये आहे. परिक्षण कालावधीतील त्यांची एकुण मालमत्ता 97,38,009/- रुपये आहे. परिक्षण कालावधीत त्यांचा एकुण खर्च 89,77,512/-रुपये आहे.

गै.अ.मनोहर खिल्लारी व त्यांची पत्नी सौ.रेखा खिल्लारी यांचा दोघांचा खर्च व एकुण मालमत्ता 1,87,15,521/- रुपये यामधुन दोघांचे एकुण उत्पन्न 1,43,09,746/- रुपये वजा जाता त्यांच्याकडे 44,05,775/- इतकी अधिकची (अपसंपदा) त्यांचे उत्पन्नापेक्षा जास्त आहे. त्यांच्या दोघांच्या अपसंपदेची गणना केली असता अपसंपदा ही +30.78 टक्के इतकी असल्याचे निश्पन्न होत आहे.

त्यामुळे आरोपी.मनोहर लक्ष्मण खिल्लारी यांनी स्वतः व पत्नी सौ.रेखा मनोहर खिल्लारी यांनी एकुण उत्पन्नाच्या ज्ञातस्त्रोता पेक्षा 44,05,775/- रू.इतकी म्हणजेच + 30.78 टक्के इतकी अपसंपदा संपादित केल्याचे निश्पन्न झाले असल्याने आरोपी लोकसेवक मनोहर लक्ष्मण खिल्लारी, वय 60 वर्ष, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी जि. हिंगोली, रा.माऊली नगर,गोरे ले आउट, वाशिम जि. वाशिम यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 13(1)(ई), 13(2) अन्वये व दिनांक-26 जुलै 2018 नंतर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 ( सुधारणा कायदा 2018) चे कलम 13(1)(ब) सह कलम 13(2) अन्वये गुन्हा केला असुन त्यांची पत्नी सौ.रेखा मनोहर खिल्लारी यांनी आरोपी लोकसेवक मनोहर खिल्लारी, यांनी प्राप्त केलेली अपसंपदा स्वतःच्या नावे बाळगुण गुन्हयास प्रोत्साहन दिले म्हणुन त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 13(1)(ई), 13(2), सहकलम 109 भारतीय दंड सहींता अन्वये व दिनांक-26 जुलै 2018 नंतर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 ( सुधारणा कायदा 2018) चे कलम 13(1)(ब) सह कलम 13(2) सहकलम 12 अन्वये गुन्हा दाखल होण्यासाठी माझी सरकार तर्फे फिर्याद आहे.

(राजेश मलपिलु)
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि.हिंगोली.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
VIKAS MAROTI GANWAT
**Rank** (पद): Dy. SP (Deputy Superintendant **No.**(क्र.): DGPVMGM8101
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे. हिंगोली (श.)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANDEEP KHANDER.
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):